VPCCECM

FYBABED Semester End Examination (Regular/Repeat)

---

**Course Title:** मराठी ललित निबंध, निबंध लेखन, लिंग आणि वचन विचार
**Subject:** Marathi
**Semester:** I
**Course Type:** Optional Marathi
**Duration:** 2 Hours
**Max Marks:** 70

**सूचनाः** १. सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे.
२. उजव्या हाताकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३. प्रत्येक नवीन प्रश्नांचे उत्तर नवीन पानावर सुरु करावे.

---

**प्र.१. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(३×५= १५)**

१. ललित निबंधाची कोणतीही पाच वैशिष्ट्ये लिहा.
२. लेखक प्रकाश नारायण संत यांचा परिचय करुन द्या.
३. उटीच्या जंगलातील दिवस लेखकाला का आठवतात ?
४. लेखक मारुती चितमपल्लींनी सांगितलेले चिंचेचे उपयोग लिहा.
५. लेखकाने पळसावर लिहिलेली कथा लिहा.

**प्र.२. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(३×५= १५)**

१. वनात भटकताना मारुती चितमपल्लींना झाडे कशी दिसतात.
२. निंबाच्या वृक्षाविषयी लेखकाने कोणती गोष्ट सांगितली आहे ?
३. सुमेधा कामत देसाई यांच्या वाङ्मयाचा थोडक्यात परिचय लिहा.
४. 'मोहा फुलला' या लेखात सामान्य माणूस मोहाच्या फुलांचा वापर कसा करतो ते लिहा.
५. सांबराचे लोटण या लेखाच्या आधारे सांबर प्राण्याचे विशेष लिहा.

**प्र.३. खालीलपैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा .** **(२×५= १०)**

१. "टवऱ्या मुहाडोर सापाचा आवाज."
२. 'निलगाईनं ते कासव खाल्लं आहे.'
३. "ही वारुळं नाहीत सायब. ती समुद्र- विंचवाची घरं आहेत."
४. "असं काय! कशा दिसतात त्या?"

**प्र.४. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.** **(२×५= १०)**

१. परभृत
२. मनाली
३. कैलास
४. आनंददायी कावळे

**प्र.५. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **(१×१०= १०)**

१. 'रानभूल' या ललित लेखसंग्रहाचा परिचय करुन द्या.
२. 'चांदण्याचा रस्ता' मधील तुम्ही वाचलेल्या कोणत्याही एका लेखाच्या आशय सौंदर्याविषयी लिहा.

**प्र.६.**

**अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **(१×६= ६)**

१. सागराच्या किनाऱ्यावर
२. पिंजऱ्यातील वाघाचे मनोगत

**आ) खालील शब्दांचे लिंग बदला.** **(४×१/२= २)**

१. हंस-
२. तेली-
३. गृहस्थ-
४. ग्रंथ-

**इ) खालील शब्दांचे वचन बदला.** **(४×१/२= २)**

१. वासरु -
२. घड्याळ-
३. दासी-
४. वाटिका-